Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 October 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.०० वा.**

****

उत्पादन-चलित अर्थव्यवस्थेच्या मार्गानेच भारत विकसित राष्ट्र बनू शकतो, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. देशात शालेय स्तरावरील हॅकेथॉन स्पर्धा, विकसित भारत बिल्डेथॉन २०२५चं उद्घाटन करताना ते आज बोलत होते. विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारताला स्पष्ट दृष्टिकोन, प्रगत तंत्रज्ञान आणि आयटी-चालित उपायांची आवश्यकता असून, येत्या काळात विद्यार्थी हे उपाय तयार करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बिल्डेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचं अभिनंदन करताना प्रधान म्हणाले:

**बाईट – केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान**

तीन लाखांहून अधिक शाळा आणि २५ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी या बिल्डेथॉनमध्ये व्हर्च्युअल पद्धतीने भाग घेतला आहे. शिक्षण मंत्रालयाने अटल इनोव्हेशन मिशन आणि नीती आयोगाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या देशव्यापी उपक्रमात शाळा आणि शिक्षकांना इयत्ता ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम करण्यासाठी आमंत्रित केलं आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतल्या, राष्ट्रीय स्तरावरील दहा, राज्यस्तरावरील १०० आणि जिल्हास्तरावरील एक हजार विजेत्यांना एकंदर एक कोटी रुपयांची पारितोषिकं वितरीत करण्यात येतील.

****

भारतीय रेल आणि खानपान महामंडळ – आयआरसीटीसी घोटाळा प्रकरणात नवी दिल्लीतल्या राऊस अव्हेन्यू न्यायालयानं आज राजद प्रमुख लालू प्रसाद यादव, माजी मुख्यमंत्री राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांच्यासह १४ आरोपींविरोधात आरोप निश्चित केले आहेत. हा खटला रांची आणि पुरी इथल्या आयआरसीटीसी हॉटेल्सच्या निविदांमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराशी संबंधित असून, सीबीआयनं २०१७ साली तपास सुरू केला होता. न्यायालयानं सर्व आरोपींवर गुन्हेगारी कट, फसवणूक आणि भ्रष्टाचार या कलमांखाली आरोप ठेवले आहेत. लालू प्रसाद यादव यांनी मात्र आपली निर्दोषता कायम ठेवत न्यायालयीन लढा देण्याचं सांगितलं आहे.

****

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात २० जिल्ह्यांतल्या १२२ मतदारसंघांमध्ये निवडणूक पार पडणार असून, उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू होईल. या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २० ऑक्टोबर, छाननी २१ ऑक्टोबर, आणि अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २३ ऑक्टोबर अशी आहे. दुसऱ्या टप्प्यातलं मतदान ११ नोव्हेंबरला होईल.

****

पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनला आज चार वर्षे पूर्ण होत आहेत. विविध आर्थिक क्षेत्रांना बहु-पद्धतीने जोडणी प्रदान करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ ऑक्टोबर २०२१ रोजी या मास्टर प्लॅनची सुरुवात केली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी, पीएम गतिशक्ती – राष्ट्रीय मास्टर प्लॅनने देशाच्या पायाभूत सुविधा नियोजनात परिवर्तन घडवून आणल्याचं म्हटलं आहे. यामुळे मंत्रालयं, राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि विविध क्षेत्रांना एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकत्र आणून, प्रकल्प अंमलबजावणीमध्ये गती, समन्वय आणि सातत्य निर्माण झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

शेतकऱ्यांना ‘मिल्क टू सिल्क’ या व्यवसायांकडे वळवण्यासाठी कृषी विभागानं उपाययोजना राबवाव्या, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. ‘आत्मा’ नियामक मंडळाची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. २०२५-२६ साठी जिल्ह्यात कृषी विस्तार सुधारणा सहाय्य कार्यक्रमासाठी २ कोटी ३६ लाख ४७ हजार रुपयांच्या आराखड्यास तसंच जिल्ह्यात १५ ठिकाणी ग्रामस्तरीय माती परिक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली. जिल्ह्यात नैसर्गिक, सेंद्रीय शेती क्षेत्रात वाढ करण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याच्या सुचनाही स्वामी यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

****

बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातल्या बावी गावात बिबट्याच्या हल्ल्यात राजेंद्र गोल्हार या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाकडून गावकऱ्यांना महत्त्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

****

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान दिल्लीत सुरु असलेल्या दुसर्या कसोटी क्रिकेट सामन्यात, शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडिजच्या चार बाद २७७ धावा झाल्या होत्या. या डावात भारताकडून मोहम्मद सिराजने दोन, तर रविंद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. वेस्ट इंडिजच्या संघानं सात धावांची आघाडी मिळवली आहे.

****

राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

****